वादीतर्फे साक्षीदार क्र.२
मी शपथेवर सांगतो की,

<u>नि.क्र.६३ वरील आदेशान्वये-</u>
<u>उलटतपास प्रतिवादी क्र. २ तर्फे त्यांचे वकील व्ही. आर. बोरकर यांद्वारे -</u>

३. मी मुळचा नागपुरचा आहे. मी सर्वे नं. २२३ मधील मिळकत कोणाकडून खरेदी केली होती त्यांचे पुर्ण नाव मला आठवत नाही परंतु त्यांचे आडनाव हे लांजेवार असे होते. मी खरेदी केलेल्या जमिनीचा रिसर्वे झालेला नाही. हे मला माहित नाही की मी खरेदी केलेल्या मिळकतीचा सन १९८५ मध्ये त्या जमिनीचा रिसर्वे झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रचलीत गट नंबर प्रमाणे खरेदीपत्र केले जाते. माझ्या जमिनीचा सर्वे नं. १२२ आहे. माझ्या खरेदीपत्राची तारिख मी सांगु शकत नाही. खरेदीपत्र हे १९९० मध्ये करण्यात आले होते. खरेदीपत्र करतांना खरेदीपत्रामध्ये चतुर्सिमा नमुद असते. मी माझ्या जमिनीची चतुर्सिमा सांगु शकतो. माझ्या जमिनीच्या .......

पुर्वेस- रस्ता

पश्चिमेस-कवडु महाजन यांची भुदान जमिन

उत्तरेस- रंजनाबाईचे जमिन

दक्षिणेस- भुदानची जमिन

साक्षीदार स्वतःहुन सांगतो की माझ्या जमिनीच्या उत्तरेस वादीची जमिन आहे. माझे खरेदीपत्र हे वादीच्या खरेदीपत्राच्या आगोदरचे आहे.

प्रश्न- तुमच्या खरेदीपत्राच्या वेळेस उत्तर बाजुस रंजनाबाई यांची जमिन होती का ?

उत्तर त्यावेळेस लांजेवार यांची जमिन होती. मी अर्धी जमिन घेतली आणि अर्धी जमिन वादीने घेतली.

माझे आणि वादीचे दोन वेग-वेगळे खरेदीपत्र झाले.

प्रश्न- जागा तुम्ही कोणाकडुन विकत घेतली ?

उत्तर- प्रभु बाला लांजेवार यांच्याकडुन विकत घेतली.

मी स्वतः शेती करतो. मी कधी शेती करतो अथवा कधी शेती करत नाही. मी कायमस्वरुपी शेतकरी नाही. ज्या ज्यावेळेस मी सुटीसाठी नागपुर येथे येतो, त्या-त्या वेळेस मी माझ्या

शेतामध्ये जातो. हे म्हणणे खरे नाही की कोण, कुठे शेती करत आहे, याची मला माहिती नाही.

प्रश्न- प्रभु बाला लांजेवार यांच्याकडुन तुम्ही शेतजमिन विकत घेतली नाही ?

उत्तर खरेदीपत्र पाहुन सांगु शकतो.

हे म्हणणे खरे नाही की मी कधीही माझ्या शेतामध्ये गेलो नाही, त्यामुळे शेजारी कोणाची शेतजमिन आहे आणि कोण शेती करते याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की मी वादीच्या सांगण्यावरुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास प्रतिवादी क्र. ३ तर्फे त्यांचे वकील चक्रवर्ती यांद्वारे -</u>

मी सध्या नागपुर येथे राहत आहे. सन १९९० मध्ये मी नागपुर येथेच राहत होतो. सालई हे माझ्या घरापासुन ३९ कि.मी. अंतरावर आहे. मी सि.बी.आय. खात्यामध्ये नोकरीला होतो. सध्या मी फौजदारी प्रकरणांमध्ये वकीली करत आहे. हे म्हणणे खरे आहे की कर्ता मयत झाल्यानंतर, त्याच्या वारसांच्या संमतीने खरेदीपत्र केले जाउ शकते. हे म्हणण खरे नाही की मी लांजेवार कुटुंबाकडुन जमिन खरेदी केली नाही व त्यांना मी पाहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की ज्यावेळेस मी जमिन खरेदी केली, ती जमिन त्या ठिकाणी अस्तित्वात नव्हती. हे म्हणणे खरे नाही की वादीने वादग्रस्त मिळकत कधीही खरेदी केली नाही आणि मी कधीही वादीसोबत गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की १९९० मध्ये वादग्रस्त मिळकत आणि तिचा सर्वे नंबर अस्तित्वात नव्हता. हे म्हणणे खरे नाही की मी आणि वादीने मिळून केवळ सर्वे नं.१२२ मधील जमिन घेतली होती. साक्षीदाराला नि.५२ दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की खरेदीपत्र बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की रंजनाबाई ही कधी वादग्रस्त मिळकतीवर गेली नव्हती. रंजनाबाईने तिच्या मिळककतीमध्ये सन १९९० पासुन ते आजतागायत कोणते पिक घेतले हे मी सांगु शकत नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की रंजनाबाई ही मयत आहे. हे म्हणणे खरे नाही की वादीने कधीही शेती केली नाही. हे म्हणणे खरे नाही की वादीने सर्वे नं. २२६ खरेदी केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की वादी माझा मित्र असल्याने वादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

I.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2025.08.16 12:13:29 +0530

दिनांक १४/०८/२०२५
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. Khobragade (Gr.-II)